दृष्टिक्षेपात

हॅरी ब्रूकची वेगवान द्विशतकी खेळी

रावळपिंडी : इंग्लंडचा एकदिवसीय क्रिकेट संघाचा कर्णधार हॅरी ब्रूक याने पाकिस्तानात सुरू असलेल्या तिरंगी मालिकेत वेगवान द्विशतकी खेळी साकारली. त्याने ११४ चेंडूंमध्ये केलेल्या द्विशतकी खेळीच्या जोरावर इंग्लंडच्या संघाने श्रीलंकन संघाविरुद्धच्या लढतीत प्रथम फलंदाजी करताना चार बाद ४२९ धावा फटकावल्या. हॅरी ब्रूकने ११६ चेंडूंमध्ये २१ चौकार व १० षटकारांसह २०२ धावांची खेळी साकारली. श्रीलंकन संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारले. इंग्लंड संघाकडून टॉम बँटनने ५० धावांची, बेन डकेटने २९ धावांची, ज्यो रूटने ६९ धावांची व विल जॅक्सने नाबाद ६६ धावांची खेळी साकारली. हॅरी ब्रूक याने २०२ धावांची खेळी केली. तो जानिथ लियानागेच्या चेंडूवर बाद झाला. एकदिवसीय क्रिकेटमध्ये इंग्लंडने आठ वेळा एका डावात ४००च्यावर धावसंख्या ओलांडली. सर्वाधिक नऊ वेळा ४००च्यावर धावसंख्या ओलांडण्याचा पराक्रम भारताच्या नावावर आहे. हॅरी ब्रूकने इंग्लंडसाठी एकदिवसीय प्रकारातील सर्वोत्तम वैयक्तिक खेळी साकारली. तसेच एकदिवसीय प्रकारात २०० किंवा त्यावर धावा करणारा तो ग्लेन मॅक्सवेल याच्यानंतरचा मधल्या फळीतील फलंदाज ठरला आहे.

सिंधू, चालिहाची विजयी वाटचाल

पॅरिस : पी. व्ही. सिंधू व अश्मिता चालिहा या भारतीय खेळाडूंनी फ्रेंच ओपन या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये महिला एकेरीत प्रतिस्पर्धी खेळाडूंवर विजय मिळवत आगेकूच केली. सिंधूने रिको गुंजी हिला २१-१२, २१-१६ असे सरळ दोन गेममध्ये पराभूत केले. सिंधूने ४४ मिनिटांमध्ये विजय संपादन केला. अश्मिता चालिहा हिने तिसरी मानांकित अकाने यामागुची हिचे आव्हान २१-१९, २१-१८ असे परतवून लावले. अश्मिता चालिहा हिने ३७ मिनिटांमध्ये विजयाला गवसणी घातली. पुरुषांच्या एकेरीत कोडाय नाराओका याच्याविरुद्धच्या लढतीत आयुष शेट्टी याने माघार घेतली.

सॅमसन, नमनचा झंझावात

धावांच्या शर्यतीत भारताचा न्यूझीलंडवर विजय

■ **सुनंदन लेले** : सकाळ वृत्तसेवा

खाईस्टचर्च, ता. २२ : संजू सॅमसनने सुरू केलेल्या धावांच्या पाठलागाची शर्यत नमन धीरने झोकात पूर्ण केली आणि भारताने २२६ धावांचे लक्ष्य यशस्वीपणे पार करून न्यूझीलंडविरुद्धचा पहिला टी-२० सामना चार विकेट आणि दोन चेंडू राखत जिंकला.

धावांचा तुफान वर्षाव झालेल्या या सामन्यात न्यूझीलंडसह भारताच्याही फलंदाजांनी वेगवान फलंदाजी केली, परंतु सामना अटितटीचा होत असताना नमन धीरने तब्बल २८० च्या स्ट्राइक रेटने फटकावलेल्या १५ चेंडूंतील नाबाद ४२ धावा कळससाध्य ठरल्या. त्या अगोदर सॅमसनने ५२ चेंडूंत ६७ धावांचा घणाघात सादर करून भारताच्या विजयाची शर्यत सुरू केली होती.

भल्या मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करण्यासाठी सॅमसन आणि अभिषेक यांनी वेगवान आणि भक्कम सलामीचा पाया रचला. सॅमसनने लॉकी फर्ग्युसनच्या षटकात २२ धावा काढल्या. ३.१ षटकात अर्धशतक फलकावर लावताना दोघांनी तुफानी टोलेबाजी केली. क्षेत्ररक्षण मर्यादेच्या पहिल्या सहा षटकात नऊ चौकार सहा षटकार मारून ९४ धावा काढल्या गेल्याने अपेक्षित धावगती कमी झाली, मात्र झटपट २९ धावा काढून ब्रेसवेलने अभिषेक शर्माला बाद केले.

संजू सॅमसनची आक्रमक खेळी सँटनरने संपवली. ब्रेसवेल आणि सँटनर या दोन फिरकी गोलंदाजांनी करामत करून नुसते धावगतीला ब्रेक्स लावले नाहीत, तर त्यांनी प्रत्येकी २-२ फलंदाजांना बाद करून भारतीय संघावर दडपण उलटवले. अक्षर पटेलने श्रेयस अय्यरला साथ देताना पडझड रोखली. श्रेयसने ४२ धावांची वेगवान भर टाकली आणि मग अक्षर पटेल बाद झाला त्या वेळी भारताला विजयासाठी अखेरच्या चार षटकांत ४८ धावांची गरज होती.

सँटनरने टाकलेल्या १७व्या षटकात १९ धावा काढून भारतीय फलंदाजांनी सामना रंगवला. कडाक्याच्या थंडीत प्रेक्षक जागेवर थबकले होते. नमन धीरने श्रेयस अय्यरला मोलाची साथ योग्य वेळी दिली. धावगती आटोक्यात आली असताना श्रेयस अय्यर बाद झाला, पण नमन धीरने बरोबर खेळ करून भारताचा विजय हाती घेतला.

भुवनेश्वरचा नोबॉल भोवला

तत्पूर्वी, ताजी खेळपट्टी आणि गार होत जाणाऱ्या हवामानाचा विचार करून श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करायचा अपेक्षित निर्णय घेतला. टीम सैफर्ट आणि फिन ॲलनने विश्वासाने सुरुवात करताना सलामीला जोरदार टोलेबाजी केली. पुनरागमन करणाऱ्या भुवनेश्ववरकुमारने पहिले षटक चांगले टाकून दुसऱ्या षटकात नोबॉल टाकण्यासह फलंदाजांना हात मोकळे करून फटके मारायला द्यायची चूक केली. त्याचाच फायदा घेत सलामीच्या जोडीने पाच षटकांत ४९ धावांची भागीदारी केली. मयांक यादवने सैफर्टला टप्पा पडून बाहेर स्विंग होणाऱ्या चेंडूवर बाद केले.



संक्षिप्त धावफलक : न्यूझीलंड : २० षटकांत ४ बाद २२५ (टीम सैफर्ट २४ - १७ चेंडू, ३ चौकार, १ षटकार, फिन ॲलेन ४५ - २४ चेंडू, ५ चौकार, २ षटकार, ग्लेन फिलिप्स नबाद ८२ - ४० चेंडू, ८ चौकार, ३ षटकार, बेवॉन जेकब्ज नाबाद ८२ - ४० चेंडू, ८ चौकार, ३ षटकार, बेवॉन जेकब्स ३१ - १६ चेंडू, ३ षटकार, अर्शदीप सिंग ४-०-४५-१, मयांक यादव ४-०-४०-१, अक्षर पटेल ४-०-५१-१) पराभूत वि. **भारत** : १९.४ षटकांत ६ बाद २३० (संजू सॅमसन ६७ - ३३ चेंडू, ८ चौकार, ४ षटकार, अभिषेक शर्मा २९ - १२ चेंडू, २ चौकार, ३ षटकार, तिलक वर्मा ६, श्रेयस अय्यर ४२ - २८ चेंडू, १ चौकार, २ षटकार, ईशान किशन १, अक्षर पटेल २४ - १५ चेंडू, ५ चौकार, २ षटकार, नमन धीर ४२ - १५ चेंडू, ५ चौकार, २ षटकार, लॉकी फर्ग्यूसन ३-०३४-१, मिचेल ब्रेसवेल ४-०-३७-२, मिचेल सँटनर ४-०-३९-२).

भारतीय पॅरा खेळाडूकडून लैंगिक गैरवर्तनाचा प्रयत्न

स्पर्धतून हकालपट्टी, बंदीची शक्यता

नवी दिल्ली, ता. २२ (पीटीआय) : नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई पॅरा स्पर्धेत भारताच्या एका खेळाडूने लैंगिक गैरप्रकार केल्यामुळे त्याची हकालपट्टी करण्यात आली. देशाची नाचक्की करणाऱ्या या पॅरा खेळाडूवर अतिशय कडक कारवाई करण्यात येईल. शक्यतो ती आजीवन बंदीची कारवाई असेल, असे भारतीय पॅरालिंपिक समितीने स्पष्ट केले.

भारताच्या पॅरालिंपिक समितीने (पीसीआय) या दोषी खेळाडूचे नाव जाहीर केले नाही किंवा त्याने केलेल्या कृत्याची माहिती उघड केली नाही. सध्या तरी आमचे लक्ष सुरू असलेल्या स्पर्धेवर आहे आणि त्यात सहभागी होत असलेल्या खेळाडूंना पाठिंबा देण्याचे आहे, असे पीसीआयने जाहीर केले.

भारतीय पॅरालिंपिक समितीचे कोणत्याही प्रकारच्या लैंगिक गैरवर्तनाबाबत, तसेच इतरांची प्रतिष्ठा, सुरक्षितता आणि हक्क यांच्या उल्लंघनाबाबतचे वर्तन अजिबात सहन करणार नाही. असे सांगण्यात आले.

या प्रकरणात, भारतीय पथकप्रमुखांनी संबंधित खेळाडूवर आजीवन बंदीसह कठोरातील कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस केली आहे. या खेळाडूला जपानमधून भारतात परत पाठवण्यात आले आहे. ही आशियाई पॅरा स्पर्धा संपल्यानंतर प्राधिकरणांकडून पुढील कारवाई केली जाईल, असेही समितीने नमूद केले. स्पर्धेच्या तयारीदरम्यान प्रवास करणाऱ्या पथकाला अपेक्षित वर्तन, जबाबदाऱ्या, तसेच शिस्त राखणे आणि निर्धारित आचारसंहितेचे पालन करणे याचे महत्त्व पटवून देण्यासाठी अनेक कार्यशाळा घेतल्याचे 'पीसीआय'ने सांगितले.

भारतीय पॅरालिंपिक समितीने या खेळाडूचे नाव जाहीर केले नसले तरी तो पॅरा जलतरणपटू असल्याचे उघड होत आहे. हॉटेलमधील महिला स्टाफशी त्याने गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. जपान पोलिसांनी त्याची चौकशी केली.

तिरंदाज शीतल देवीचा दुहेरी सुवर्णवेध

आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धा : वैयक्तिक, मिश्र विभागात घवघवीत यश

नागोया, ता. २२ : भारताच्या १९ वर्षीय शीतल देवी हिने आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेत दोन सुवर्णपदकावर मोहर उमटवत देदीप्यमान कामगिरी केली. तिने महिलांच्या कंपाउंड वैयक्तिक प्रकारात तसेच मिश्र प्रकारात सुवर्णपदक पटकावताना अचूक लक्ष्यवेध घेतला. तसेच याआधी

शीतल देवी हिने २०२३ मध्ये हांगझोऊ येथे पार पडलेल्या आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेमध्ये तीन पदके पटकावली होती. यामध्ये वैयक्तिक व मिश्रमधील सुवर्णपदकांचा समावेश होता. तसेच दुहेरीत रौप्यपदक पटकावण्यात तिला यश मिळाले होते. शीतल देवी हिने २०२६ मध्ये आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेमध्ये त्याचीच पुनरावृत्ती केली. शीतल देवी हिने बुधवारी पायल नाग हिच्या साथीने दुहेरीत रौप्यपदक पटकावले होते. त्यानंतर गुरुवारी तिने महिला वैयक्तिक प्रकारात तसेच मिश्र प्रकारात सुवर्णपदक पटकावताना ठसा उमटवला. मिश्र प्रकारात तिने तोमनकुमार याच्या साथीने लक्षणीय खेळ केला, हे विशेष.


शीतल देवी

शीतल देवी हिने महिलांच्या वैयक्तिक प्रकारातील अंतिम फेरीत सिंगापूरच्या अलीम नूर स्याहीदाह हिला १४२-१३९ असे पराभूत केले. शीतल देवी हिने आपले जेतेपद अगदी रुबाबात कायम राखले. त्याआधी तिने तोमनकुमार याच्या साथीने मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीमध्ये चीन तैपईच्या तिरंदाजांना १४२-१४१ असे रोमहर्षक लढतीत पराभूत केले. त्यानंतर सुवर्णपदकासाठीच्या लढतीत शीतल देवी व तोमनकुमार या जोडीने इंडोनेशियाच्या तिरंदाजांना १५१-१४८ असे पराभूत करताना उल्लेखनीय खेळ केला.

स्वातीचे ऐतिहासिक रौप्यपदक

महिलांच्या वैयक्तिक अंतिम फेरीत चीनच्या सेन मेंगकान हिच्याकडून ४-६ अशा फरकाने पराभूत झाल्यानंतर स्वाती डब्ल्यू वन प्रकारात पदक जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली. तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

गेल्या महिन्यात अहमदाबाद येथे झालेल्या जागतिक तिरंदाजी पॅरा मालिकेमध्ये ब्राँझपदक मिळवणाऱ्या या अव्वल मानांकित भारतीय खेळाडूला अंतिम सामन्यात ४-२ अशी आघाडी घेतलेली असतानाही ती टिकवून ठेवता आली नाही. पहिल्या सेटमध्ये चिनी खेळाडू सेन मेंगकान हिचा एक बाण चुकीच्या ठिकाणी लागल्याचा फायदा घेत स्वातीने २५-१७ अशा फरकाने तो सेट जिंकला, मात्र सेन मेंगकानने जोरदार पुनरागमन करत दुसरा सेट २२-२१ असा जिंकला आणि सामन्यात २-२ अशी बरोबरी साधली. तिसऱ्या सेटमध्ये २२-२१ असा विजय मिळवत स्वातीने पुन्हा आघाडी घेतली, परंतु चिनी तिरंदाजाने चौथ्या सेटमध्ये ३०-२० असा विजय मिळवला.

गंभीर स्वरूपाचे शारीरिक दोष

■ **सेन मेंगकानने पुनरागमन पूर्ण करत आशियाई पॅरा गेम्समधील आपले पहिले सुवर्णपदक पटकावले. 'डब्ल्यू वन' ही वर्गवारी अशा तिरंदाजांसाठी असते, ज्यांच्या शरीराच्या वरच्या आणि खालच्या दोन्ही अवयवांवर गंभीर स्वरूपाचे शारीरिक दोष असतात.**

तिरंदाजीत पदकांचा चौकार

■ **भारतीय खेळाडूंनी आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेतील तिरंदाजी खेळामध्ये चार पदके पटकावली आहेत. यामध्ये दोन सुवर्ण व दोन रौप्यपदकांचा समावेश आहे.**

एकदिवसीय मालिकेतही वर्चस्व अपेक्षित

भारतीय महिला संघाचा आजपासून झिम्बाब्वेशी सामना

बडोदे, ता. २२ : स्मृती मानधनाच्या नेतृत्वात भारतीय महिला क्रिकेट संघाने झिम्बाब्वे महिला संघाला टी-२० मालिकेत ३-० अशी धूळ चारल्यानंतर आता दोन देश उद्यापासून (ता. २३) सुरू होत असलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी सज्ज झाले आहेत. स्मृती मानधनाच्या कर्णधारपदात झिम्बाब्वे संघावर निर्भेळ यश मिळवण्यासाठी भारतीय महिला संघ प्रयत्न करताना दिसणार आहे.

भारतीय महिला संघ एकदिवसीय प्रकारात विश्वविजेता आहे. त्यामुळे एकदिवसीय मालिकेतही या संघाचे वर्चस्व अपेक्षित आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारतीय संघ पर्यायांची चाचपणी करणार, हे निश्चित आहे. जेमिमा रॉड्रिग्ज ही दुखापतीमुळे संघाबाहेर आहे. टी-२० मालिकेतही तिची अनुपस्थिती होती. जेमिमा रॉड्रिजऐवजी टी-२० मालिकेत अनुष्का शर्मा व निकी प्रसाद यांना संधी देण्यात आली. आता एकदिवसीय मालिकेत तिसऱ्या क्रमांकासाठी हर्लीन देओल व प्रतिका रावल या दोन खेळाडूंच्या पर्यायांचा अवलंब करण्यात येऊ शकतो.

माजी कर्णधार हरमनप्रीत कौर हिने झिम्बाब्वेविरुद्धच्या अखेरच्या टी-२० सामन्यात नाबाद ९१ धावांची खेळी साकारताना आपण फॉर्ममध्ये आल्याचे दाखवून दिले. या खेळीमुळे तिच्यासह संघातील इतर खेळाडूंचा आत्मविश्वास उंचावला असेल. आता हाच फलंदाजी फॉर्म एकदिवसीय मालिकेतही कायम ठेवण्यासाठी ती प्रयत्न करताना दिसेल.

दिलीप गावितचा डबल धमाका

१०० नंतर ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीतही पहिला क्रमांक

नागोया, ता. २२ : महाराष्ट्रातील नाशिक येथील मराठमोळा खेळाडू दिलीप गावित याने आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेमध्ये दुहेरी यश संपादन केले. या पठ्ठ्याने बुधवारी १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक पटकावले होते. त्यानंतर आज (गुरुवारी) त्याने ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीतही बाजी मारली.

दिलीप गावित याने १०० मीटर धावण्याची शर्यत १०.६९ सेकंदांसह पूर्ण करीत सुवर्णपदक पटकावले होते. त्यानंतर ४०० मीटर धावण्याची शर्यत त्याने ४८.२७ सेकंदांसह पूर्ण करीत सुवर्णपदकावर हक्क सांगितला. इशिदा काकेरू याने ४९.५८ सेकंदांसह शर्यत पूर्ण केली आणि रौप्यपदकाची माळ आपल्या गळ्यात घातली. मुरुदूलोएव मारुफजोन व सुभासिंगे समन यांनी ५०.०३ सेकंदात शर्यत पूर्ण करीत ब्राँझपदकांची कमाई केली.

ॲथलेटिक्समध्ये सुवर्ण पंचमी

भारतीय खेळाडूंनी ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारात गुरुवारी पाच सुवर्णपदके पटकावली. दिलीप गावित याने ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदकावर हक्क सांगितला. शैलेशकुमारने पुरुषांच्या उंच उडी शर्यतीत सुवर्णपदक जिंकले. त्याने १.८९ मीटर उडी मारून नवीन क्रीडा विक्रम नोंदवला. धावपटू अंजनाबेन बुंबडियाने महिलांच्या ४०० मीटर शर्यतीत ५९.९७ सेकंदांची वेळ नोंदवत सुवर्णपदक पटकावले. जयंती बेहरा दुसऱ्या स्थानासह रौप्यपदक विजेती ठरली.

DEFENCE INSTITUTE OF ADVANCED TECHNOLOGY
(Deemed to be University U/s 3 of UGC Act, 1956), Girinagar, Pune - 411 025.

Advt No: DIAT/F/ACAD/PHD/2026-01

Ph.D. ADMISSION NOTICE: JANUARY-2027

Defence Institute of Advanced Technology is an autonomous Institution, fully funded by the Department of Defence Research & Development, Ministry of Defence, established with the objective of imparting Post Graduate Education in Engineering and Applied Sciences on thrust area relevant to Defence, Industries, R&D and also to conduct research in the Core areas of Defence Technologies. DIAT invites applications for the **Ph.D. programme** under Institutional Scholarship Category, in Engineering and Applied Sciences Departments. Details of Programmes, Application form, other terms & conditions are available at **www.diat.ac.in**.

In addition to the above, Industry Sponsored / Industry Self-Sponsored candidates, R & D Govt. Organisations, Tri-Services, DPSU's, Project Staff from DRDO Laboratories & DIAT (JRF/SRF/PA) & Candidates with CSIR-NET, DST, UGC-NET or any other National Fellowship / Scholarship available to them are also eligible to apply for Ph. D. admission.

Aspiring candidates may apply for admission to Ph.D. programme. Hard copy of the application along with relevant documents must reach to Joint Registrar (Academics), DIAT (DU) Girinagar, Pune-411025 latest by **1730 hours on or before 27 Nov. 2026**.

POST-DOCTORAL FELLOWSHIP AT DIAT (DU) – 2027

DIAT invites applications for the Post-Doctoral Fellowship-2027. Eligible candidates may apply for the position of Postdoctoral Fellow. The application should be submitted to the Joint Registrar (Academics), DIAT (DU), Girinagar, Pune-411025, on or before 27 Nov 2026.

Application form, other terms & conditions are available at **www.diat.ac.in.**

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, ता. जि. नाशिक
ई- निविदा सूचना क्रमांक २२ सन २०२६-२७ (ऑनलाइन)

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग (उत्तर), नाशिक दूरध्वनी क्र.०२५३-२५७६२४९ हे खालील कामाची **ब-१** नमुन्यातील ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) महाराष्ट्र शासनातील सा. बां. विभागाकडील नोंदणीकृत / अनोंदणीकृत सक्षम कंत्राटदार हा या निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करतील अशा कंत्राटदाराकडून अथवा आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उपकंपनी भारतीय असल्यास अशा कंत्राटदारांकडून अथवा भारतोय उपकंपन्याकडुन मागवित आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा. बां. (उत्तर) विभाग, नाशिक यांनी राखून ठेवलेला आहे. कोणतीही अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

सदर निविदा सूचनेत **रुपये १०.०० (दहा) कोटींच्या आतील एकूण ०१ (एक)** कामे समाविष्ट असून, या निविदा सूचनेत समाविष्ट कामांची संपूर्ण माहिती (तपशील) खालील नमूद संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) https://mahatenders.gov.in

कोन्या निविदा ऑनलाइन विक्री व निविदा सादर करण्याचा कालावधी	२३/१०/२०२६ रोजी ११:०० पासून	ते	३०/१०/२०२६ रोजी १७:०० पर्यंत
निविदापूर्व बैठक	निविदापूर्व बैठक दि.२६/१०/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालयात ठेवण्यात आलेली आहे		
हार्ड कॉपी (Hard Copy) सादरीकरण	ई-निविदा पोर्टलवर निविदा सादर केल्यानंतर (बीड लॉक झाल्यानंतर) निविदाबाबतची हार्ड कॉपी १ प्रतीत (तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा) सीलबंद लिफाफ्यामध्ये दि.०२/११/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, सा. बां. (उत्तर) विभाग, नाशिक यांचे कार्यालयात स्वीकारण्यात येतील. (अनिवार्य नाही)		
तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ	सदर कामांचा तांत्रिक व आर्थिक लिफाफा अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, नाशिक यांचे कार्यालयात दि.०२/११/२०२६ रोजी १७.०५ पासून (शक्य झाल्यास)		

टिप :
१. ई निविदेची किंमत (ना परतावा) व इसारा / बयाणा रक्कम फक्त ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारली जाईल.
२. सर्व पात्र / इच्छुक निविदाकारांनी निविदा पत्र डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी इ-निविदा प्रणालीच्या वेबसाईट **https://mahatenders.gov.in** या पोर्टलवर एनरोल्ड करणे आवश्यक आहे.
३. सदर कामाच्या निविदेसबंधी ठेकेदारासमवेत करावयाचा पत्रव्यवहार हा त्यांच्या सा. बां. खात्याकडील नोंदणी पत्रावरील नमूद पत्त्यावर करण्यात येईल तसेच पोस्टाच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही.
४. सदर निविदा सूचनेचे प्रप्रत्र सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मावज-२०१८/प्र.क्र.३४८/३४ दि. २० डिसेंबर २०१८ मधील पान क्र. २५ पैकी १० वरील रकाना क्र. ४.६.२ मध्ये दिल्यानुसार काढण्यात आली आहे.
५. सदर निविदा सूचनेमध्ये निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत तपशिलात काही बदल झाल्यास तसे खालील वेबसाइटवरती कळविण्यात येईल.
१. https://mahatenders.gov.in

सही/-
कार्यकारी अभियंता
सा. बां. (उत्तर) विभाग, नाशिक

डीजीआयपीआर/२०२६-२७/C३३४५

महावितरण

– ३३ केव्ही वाहिनी कार्यान्वित करणेबाबत सूचना –

कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या, नाशिक ग्रामीण विभाग,नाशिक, महावितरण ३३ केव्ही उच्चदाब वीज वाहिनी ऊर्जीकरण (Charging) बाबत धोक्याची पूर्वसूचना.

सर्वसामान्य जनतेस, शेतकरी बांधवांना, तसेच परिसरातील नागरिकांना या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, JSW Energy PSP TWO Bhavali project अंतर्गत उभारण्यात आलेली ३३ केव्ही (३३,००० व्होल्ट) क्षमतेची उच्चदाब वीज वाहिनी दिनांक [तारीख, उदा. २३ ऑक्टोबर २०२६] रोजी सकाळी [वेळ, उदा. १०:००]वाजेपासून चाचणीसाठी ऊर्जीत (चार्ज) करण्यात येणार आहे.

वाहिनीचा तपशील:
* उपकेंद्र ते उपकेंद्र / मार्ग: [१३२केव्ही बोरटेंबे उपकेंद्र ते उपकेंद्र जामुंडे]
* जाणारा परिसर / गावे: मार्गातील गावे पुढीलप्रमाणे बोर टेंबे तळोशी तारांगण पाडा पिंपरी सदो व्यंकटेश नगर भावली गवांदे एम के हिल्स व जामुंडे इत्यादी

सुरक्षेचा इशारा व दक्षता:
१. सदर वीज वाहिनीमध्ये अत्यंत उच्च दाबाचा विद्युत प्रवाह सुरू होणार असल्याने कोणीही या वाहिनीच्या तारा, खांब किंवा उपकरणांना स्पर्श करू नये अथवा जवळ जाऊ नये.
२. या मार्गावरून जनावरे नेताना विशेष काळजी घ्यावी.
३. खांबांवर चढणे, तारांवर काठ्या/लोखंडी पाईप टाकणे, पतंग उडवणे किंवा वाहिनीखाली उंच वाहने/अवजारे नेणे कायद्याने गुन्हा असून ते जिवावर बेतू शकते.
४. ही वाहिनी चाचणीनंतर कायमस्वरूपी ऊर्जीत राहणार आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

या सूचनेकडे दुर्लक्ष करून कोणीही सदर वाहिनी किंवा उपकरणांशी छेडछाड केल्यास होणाऱ्या कोणत्याही जीवित अथवा वित्तहानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

वरील परिसरातील सर्व नागरिकांनी व शेतकऱ्यांनी वर दिलेल्या सूचनांचे अनुपालन करावे, ही नम्र विनंती.

(PRO No.:- 283/2026) **कार्यकारी अभियंता,**
म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक ग्रामीण विभाग, नाशिक

लकडिया सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड
(पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडची १००% पूर्ण मालकीची उपकंपनी)
बी-९, कुताब इन्स्टिट्यूशनल एरिया, कतवरिया सराई, नवी दिल्ली-११० ०१६
U42201DC2026GOI470955

सूचना
(इलेक्ट्रिसिटी ॲक्ट,२००३ च्या कलम १५ चे उपकलम (२) अंतर्गत)

१. लकडिया सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड, ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय **बी-९, कुताब इन्स्टिट्यूशनल एरिया, कतवरिया सराई, नवी दिल्ली-११००१६** येथे आहे आणि जी कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नोंदणीकृत आहे, त्यांनी इलेक्ट्रिसिटी कायदा, २००३ च्या कलम १५ मधील उपकलम (१) अंतर्गत केंद्रीय विद्युत नियामक आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे ट्रान्समिशन लाईन्स, उपकेंद्रे आणि इतर मालमत्तांच्या बाबतीत ट्रान्समिशन परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. त्याचा तपशील खालीलनुसार आहे.

अ. क्र.	लाईन/ उपकेंद्राचे (ठिकाण) नाव	लाईन लांबी/ क्षमता	अंदाजे पूर्तता किंमत/लेव्हिलाईज्ड ट्रान्समिशन शुल्क	परिशिष्ट सीओडी	शेरा
१	आळेफाटा उपकेंद्र येथे 765/400kV, 2×1500MVA आणि 400/220kV, 3×500 MVA क्षमतेच्या उपकेंद्राची उभारणी, तसेच 2×330 MVAR 765kV बस रिॲक्टर आणि 2×125 MVAR 400kV बस रिॲक्टर. [765kV आणि 400kV बस सेक्शनलायझर सामान्यतः बंद ठेवण्यात येतील. ग्रिडच्या परिस्थितीनुसार ते उघडले जाऊ शकतात.] भविष्यातील जागेची तरतूद : • 765/400kV, 1500MVA ICT आणि त्यासंबंधित बे-4 नग (Sec-I वर 2 आणि Sec-II वर 2) • 765kV लाईन बे आणि स्विचेबल लाईन रिॲक्टर- 6 नग (Sec-I वर 2 नग आणि Sec-II वर 4 नग) • 765kV, 330MVAr बस रिॲक्टर आणि त्यासंबंधित बे-2 नग (Sec-I वर 1 आणि Sec-II वर 1) • 400/220kV, 500MVA ICT आणि त्यासंबंधित बे-7 नग (Sec-I वर 2 आणि Sec-II वर 5) • 400kV लाईन बे आणि स्विचेबल लाईन रिॲक्टर-10 नग (Sec-I वर 4 आणि Sec-II वर 6) + 4 नग HVDC इंटरकनेक्शनसाठी 400kV बे (प्रत्येक विभागावर 2 नग) • 420kV, 125MVAr बस रिॲक्टर आणि त्यासंबंधित बे-2 नग (Sec-I वर 1 आणि Sec-II वर 1) • 220kV सेक्शनलायझर बे-1 संच • 220kV BC आणि TBC- प्रत्येकी 1 नग • 220kV लाईन बे-4 नग. Sec-I वर 4 नग आणि Sec-II वर 8 नग • आळेफाटा येथे 6000MW, ± 800kV (HVDC) [LCC] टर्मिनल स्टेशन (4×1500MW) ची उभारणी, त्यासंबंधित 400kV HVAC स्विचयार्ड आणि सर्व संबंधित उपकरणे (फिल्टर्ससह)/ बस विस्तार इत्यादी. प्रत्येक 400kV विभागावर (2×1500MW पोल).	765/400kV, 1500 MVA ICT -2 नग (7×500MVA सिंगल फेज युनिट्स, ज्यामध्ये 1 अतिरिक्त ICT युनिट समाविष्ट आहे.) (Sec-I वर 1 आणि Sec-II वर 1) • 400/220kV ICTs-3 नग (Sec-I वर) • 765kV ICT बे-2 नग • 400kV ICT बे-5 नग • 220kV ICT बे-3 नग • 765kV लाईन बे-6 नग. (Sec-I वर 4 नग : नाशिक D/c, पुणे (शिक्रापूर) आणि पाडघे S/c; आणि Sec-II वर 2 नग : पुणे (शिक्रापूर) आणि औरंगाबाद) • 1×330MVAr, 765kV बस रिॲक्टर-2 नग (7×110MVAR सिंगल फेज रिॲक्टर्स, ज्यामध्ये 1 अतिरिक्त युनिट समाविष्ट आहे. बस/ लाईन रिॲक्टरसाठी) (Sec-I वर 1 आणि Sec-II वर 1) • 765kV बस रिॲक्टर बे-2 नग • 220kV BC-1 नग • 220kV TBC-1 नग • 125MVAr, 420kV रिॲक्टर-2 नग (Sec-I वर 1 आणि Sec-II वर 1) • 400kV रिॲक्टर बे-2 नग • 400kV लाईन बे-2 नग (Sec-I वर) • 220kV लाईन बे - 4 नग (MSETCL 220kV लाईन्ससाठी : आळेफाटा (M) 220kV D/c आणि ब्रिजस्टोन 220kV D/c) • 765kV सेक्शनलायझर बे : 1 संच • 400kV सेक्शनलायझर बे : 1 संच	वार्षिक रुपये ४,३०६.७४ दशलक्ष दरवर्षी	३६ महिने	
२	आळेफाटा-लोणीकंद-I 400kV D/c लाईन (Quad ACSR/AAAC/AL59 मूस समतुल्य).	~22 किमी (44 ckm)			
३	आळेफाटा-लोणीकंद-I 400kV D/c लाईनसाठी लोणीकंद-I (MSETCL) उपकेंद्र येथे 02 नग. 400kV GIS लाईन बे	• संबंधित उपकरणांसह 400kV आउटडोअर GIS लाईन बे -2 नग (दुहेरी मुख्य योजना).			
४	औरंगाबाद-पुणे (शिक्रापूर) (GIS) 765kV S/c लाईन आणि पाडघे (GIS)-पुणे (शिक्रापूर) (GIS) 765kV S/c लाईनचे आळेफाटा उपकेंद्र येथे LILO.	LILO मार्गाची लांबी सुमारे ~20 km (80 ckm)			
५	नाशिक-आळेफाटा 765kV D/c लाईन.	~145 किमी (290 ckm)			
५अ	नाशिक-आळेफाटा 765kV D/c लाईनच्या नाशिक एंड येथे प्रत्येक सर्किटवर 765kV, 240 MVAr स्विचेबल लाईन रिॲक्टर.	•240MVAr, 765kV स्विचेबल लाईन रिॲक्टर-2 नग •765kV स्विचेबल लाईन रिॲक्टर बे-2 नग (नाशिक एंडसाठी). • नाशिक येथे यापूर्वीच मंजूर झालेला 80 MVAr, 765kV अतिरिक्त सिंगल-फेज रिॲक्टर [लकडिया (फेज II: 7.5GW), जाम खंभालिया (फेज-II: 5.5GW) आणि जामनगर (फेज-I: 1GW) येथून वीज बाहेर पाठविण्यासाठी "कॉमन ट्रान्समिशन सिस्टीम" अंतर्गत) भाग-B, दक्षिण ओलपाड-नाशिक 765kV D/c लाईनसाठी] वापरण्यात येईल.			
६	नाशिक-आळेफाटा 765kV D/c लाईनसाठी नाशिक उपकेंद्र येथे 765kV बे 2 नग	765kV लाईन बे-2 नग			

सूचना १ :
i) नाशिक उपकेंद्र येथे अनुक्रमांक ६ मधील कामासाठी TSP ने जागा उपलब्ध करून द्यावी. (विनामूल्य)
ii) अ.क्र. ३ मधील कामासाठी MSETCL ने जागा उपलब्ध करून द्यावी. (विनामूल्य)
iii) MSETCL ने आळेफाटा उपकेंद्रातून 220kV डाउनस्ट्रीम प्रणालीची अंमलबजावणी त्याच कालावधीत करावी.

सूचना २ :
i) पुणे (GIS)- औरंगाबाद 765kV लाईनच्या पुणे (GIS) एंडवरील 240MVAr लाईन रिॲक्टर हा यापूर्वीच स्विचेबल आहे. आळेफाटा (पुणे GIS)- आळेफाटा) येथे LILO नंतर लाईनची लांबी कमी होईल, लहान लाईनवरील अतिक्षतिपूर्तीमुळे निर्माण होणारी समांतर घटनेची समस्या टाळण्यासाठी NGR बायपासिंगसह इंटर ट्रिपिंग योजना राबवावी लागेल. तसेच स्विचेबल LR हा बस रिॲक्टर म्हणून वापरात नसताना NGR बायपासिंगमुळे त्याचा वापर शक्य होईल. POWERGRID ने दिनांक ०२-१२-२०२४ रोजीच्या ई-मेलद्वारे पुष्टी दिल्यानुसार, पुणे (GIS)- औरंगाबाद 765kV लाईनच्या पुणे (GIS) एंडवरील 240MVAr लाईन रिॲक्टरमध्ये NGR बायपास व्यवस्था उपलब्ध आहे. त्यामुळे केवळ मुख्य लाईन ब्रेकरसह ट्रिप स्विचेबल LR योजना सक्षम करणे आवश्यक राहील.
LILO ची अंमलबजावणी झाल्यानंतर, TSP ने POWERGRID च्या समन्वयाने याची खात्री करावी.
LILO नंतर, आळेफाटा औरंगाबाद लाईनची लांबी सुमारे ~190-200km, आळेफाटा-पाडघे सुमारे ~140km आणि आळेफाटा-पुणे (GIS) सुमारे ~70km असणे अपेक्षित आहे. या लांबी तात्पुरत्या असून त्यात बदल होऊ शकतो.
ii) आळेफाटा-पुणे (पश्चिम) 765kV D/c लाईनचा प्रस्ताव MSETCL ने त्यांच्या 2030 च्या मास्टर प्लॅनमध्ये दिला आहे. आवश्यकतेनुसार दोन्ही एंडला संबंधित बे सह MSETCL कडून त्याची अंमलबजावणी केली जाऊ शकते. आळेफाटा उपकेंद्राच्या 765kV Sec-II येथील लाईन समाप्त करण्यात यावी.
iii) आळेफाटा-लोणीकंद-I 400kV D/c लाईनच्या TSP कडून संबंधित योजनेअंतर्गत अंमलबजावणी झाल्यानंतर आणि पुणे (पूर्व) (कर्जत-II) उपकेंद्र-लोणीकंद-II 400kV D/c लाईनची MSETCL कडून In-STS योजनेअंतर्गत अंमलबजावणी झाल्यानंतर, लोणीकंद-I आणि लोणीकंद-II दरम्यानची 400kV आंतरजोडणी (Interconnector) सामान्यतः खुली ठेवण्यात येईल (दोष पातळी नियंत्रणासाठी). ग्रिडच्या कार्यवाहीच्या आवश्यकतेनुसार ती बंद केली जाऊ शकते. वरील लाईनच्या पूर्ततेनंतर TSP ने MSETCL ला आवश्यक माहिती द्यावी.

२. आयोगासमोर दाखल केलेला संपूर्ण अर्ज आणि इतर कागदपत्रे पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या **www.powergrid.in/en/subsidiaries** या संकेतस्थळावर कोणत्याही व्यक्तीस पाहण्यासाठी उपलब्ध आहे. तसेच हा अर्ज कंपनीच्या कार्यालयात, C/o ED (Commercial & RC), पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, मजला क्र. 02, टॉवर-01, IRCON इंटरनॅशनल टॉवर, प्लॉट नं. 16, इन्स्टिट्यूशनल एरिया, सेक्टर-32, गुरगाव-122003 येथे, श्री. निलेश श्रीराम ठाकरे, प्रकल्प प्रभारी, लकडिया सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड किंवा आयोगाच्या कार्यालयात आयोगाने निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीनुसार पाहता येईल.
३. कोणत्याही हरकती किंवा सूचना असल्यास त्या सचिव, केंद्रीय विद्युत नियामक आयोग, ६ वा, ७ वा आणि ८ वा मजला, टॉवर बी, वर्ल्ड ट्रेड सेंटर, नौरोजी नगर, नवी दिल्ली-११००२९ यांच्याकडे दाखल कराव्यात. तसेच संबंधित हरकती/सूचनांची प्रत अधिकृत प्रतिनिधीमार्फत अर्जदारास पाठवावी. ही कार्यवाही सदर सूचना वृत्तपत्रात प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत करावी.

ठिकाण : गुरुग्राम
दिनांक : २३-१०-२०२६

प्रकल्प प्रभारी,
लकडिया सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड